गुरुवार, दि. २२ मे २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २८६ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# ‘तिरंगा माझा अभिमान’

## काँग्रेसच्यावतीने भारतीय सैन दलाच्या समर्थनार्थ तिरंगा रॅली






**जालना । प्रतिनिधी -** ‘ऑपरेशन सिंदूर’ मध्ये भारतीय जवानांनी गाजवलेल्या शौर्याला सलाम व अतिरेक्यांच्या हल्ल्यात बलिदान दिलेल्याप्रती सद्भावना व्यक्त करण्यासाठी भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतीदिनी जालन्यात मामा चौक ते महात्मा गांधी पुतळ्यापर्यंत ‘तिरंगा यात्रा’ काढण्यात आली. माजी सैनिक यांचा सन्मान या ठिकाणी करण्यात आला व माजी सैनिक यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये यात्रेला सुरुवात करण्यात आली. ही यात्रा आपल्या वीर सैनिकांप्रती आदर व्यक्त करणारी आणि शहीदांना श्रद्धांजलीचं प्रतीक असल्याचे मान्यवारांनी आपल्या भाषणात सांगितले.

याप्रसंगी निरीक्षक नामदेवराव पवार, माजी आमदार कैलास गोरंट्याल, जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, कार्याध्यक्ष राजेंद्र राख यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते तथा जालनेकरांची उपस्थित होते.

जालना जिल्हा काँग्रेस कमिटी च्या वतीने भारतीय सैन्य दल च्या समर्थनात मामा चौक ते गांधी चमन पर्यंत तिरंगा माझा अभिमान रॅली काढण्यात आली होती

यावेळी प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी आ कैलास गोरंट्याल,जिल्हा प्रभारी नामदेव पवार, जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख,कार्याध्यक्ष राजेंद्र राख,आर. आर खडके,अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष बदर चाऊस, कल्याण दळे, सेवादल जिल्हा व शहराध्यक्ष शेख इब्राहिम, माजी जि.प.सदस्य राम सावंत, नंदा पवार, शीतल तनपुरे, ओबीसी सेल चे जिल्हाध्यक्ष शिवप्रकाश चितळकर, अब्दुल रऊफ, अतिख खान, रमेश गोरक्षक,संजय भगत, महावीर ढक्का, सोपान सपकाळ, आदींची उपस्थिती होती.



**जालना शहरात नूतन वसाहत भागातील वीजेचे रोहित्राला (डीपी) आग लागली होती. रोहित्र जळून खाक झाले आहे. महावितरणच्या अभियंत्यांनी यावर तात्काळ दखल घेत तातडीने डिपीचे काम सुरु केले आहे.**

**(छायाचित्र किरण खानापुरे)**

युवा आदर्श

**तिरंगा यात्रा ...**

**तिरंगा यात्रा चालते**
**उत्साही जल्लोषात**
**पराक्रम सैनिकांचा**
**उद्धृत रे आवेशात**
**एक संघ देश भक्त**
**उत्सवी लाट देशात**
**साद घाले विजयश्री**
**प्रतिध्वनी परदेशांत**
**नाक ठेचले पाकचे**
**दात कोंबले घशात**
**ओळखी शत्रू चेहरा**
**ये अतिरेकी वेशात**
**मोजत बसे चिल्लर**
**तू फाटक्या खिशात**
**भाषा रे अणूबाँबची**
**ठणठणाटी कोषात**
**सहजते देतो भारत**
**उत्तरे सुयोग्य भाषात**
**उतरवतो क्षणार्धात**
**उन्माद माज नशात**
**पुन्हा शांती प्रस्थापे**
**आम्ही न रमे द्वेषात**
**शस्त्रसंधी त्वरेमान्य**
**काही नाही विद्वेषात**
**विश्व गुरु नवा भारत**
**रस प्रगति उत्कर्षात**
**पोचवा संदेश सर्वत्र**
**अग्रस्थानी दुरंदेशात**
**चरखा अन् ब्रह्मोस**
**दोन्ही ठेवे स्वदेशात**
**बुध्द नानक न् गांधी**
**सुभाष भगत सुरेशात**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# अंत्यविधी आणि लग्नात भाषणबाजी टाळा - सुर्यवंशी

## हिंदू महासभेच्या माध्यमातून जनजागृती सुरू

**जालना । प्रतिनिधी -** अलीकडच्या काळात लग्नसोहळ्यांत सत्कारसमारंभ घेण्याचे फॅड वाढले आहे. त्यामुळे पाहुणेमंडळी विनाकारण ताटकळतात. अमका कुणी मान्यवर आहे म्हणून सत्कार केल्याने इतर पाहुणेमंडळींना आपसूकच कमी लेखल्यासारखे होते. त्यामुळे विवाहसोहळ्यात सत्कार अन भाषणे टाळायला हवीत, असे स्पष्ट मत अखिल भारत हिन्दू महासभेचे प्रदेश संघठन मंत्री तथा सकल हिन्दू समाजाचे समन्वयक धनसिंह सूर्यवंशी यांनी व्यक्त केले आहे.

लग्न सोहळा व अंत्यविधिवेळी होत असलेली भाषणबाजी या महत्त्वाच्या विषयावर धनसिंह सूर्यवंशी यांनी परखड मत व्यक्त केले. ते म्हणाले, की अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील औरंगपूरच्या ग्रामस्थांनी दशक्रिया विधीतील श्रद्धांजलीची भाषणे आणि विवाहसोहळ्यातील आशीर्वादपर दोन शब्दांवर बंदी घातली आहे.



भाषणांनी लोक कंटाळून जातात. दशक्रियाविधीत काकस्पर्श होतो तरी बराचवेळ पाहुण्यांना ताटकळत बसावे लागते. लग्नात मुहूर्त टळून जातो तरी भाषणे काही संपत नाहीत. औरंगपूरच्या ग्रामस्थांनी एका दशक्रियाविधीत जवळपास अडीच हजार लोकांसमोर ही घोषणा करून टाकली. या घोषणेची अंमलबजावणी यापुढे गावात केली जाणार आहे. या गावाचा हा आदर्श राज्यातील सर्व गावांनी आणि सर्व कुटुंबांनी घेण्याची गरज आहे, असे आवाहन श्री. सूर्यवंशी यांनी केले.

सध्या लग्नसराई सुरू असून, या शुभकार्याला अनेक मान्यवरांनाही निमंत्रित करण्यात येते. मात्र, त्यांना बोलावल्यानंतर सत्कार समारंभ इतके लांबतात, की पाहुणे मंडळी कंटाळून जातात. सत्कार झाले की मान्यवरांचे आशीर्वादपर दोन शब्द सुरू होतात; पण हे शब्द दोन कधीच नसतात, इतके लांबत जातात, की मुहूर्त टळून जातोतरी भाषणे संपत नाही. ठराविक लोकांचेच सत्कार होत असल्याने बाकीची पाहुणेमंडळी उपरी ठरते, असे ते म्हणाले. प्रत्येक जण लग्नसोहळा आणि असो की दुःखद कार्य असो, आपली सर्व कामे बाजूला ठेवून येत असतो.

मोठा प्रवास करून येत असतो. अशावेळी एखाद्यालाच मान देण्याच्या आपल्या कृतीमुळे तो विनाकारण कमी लेखला जातो, हे लक्षात घेतले पाहिजे. यापुढे सर्वांनी श्रद्धांजली अन लग्नात भाषणावर बंदी आणावी, असे आवाहन करून, याबाबत हिंदू महासभेच्या माध्यमातून जनजागृती सुरू केली असल्याचे श्री. सुर्यवंशी यांनी म्हटले आहे.

# वादळाच्या तडाख्यात सापडले प्रवाशी विमान; श्रीनगरमध्ये इमर्जन्सी लँडिंग

**श्रीनगर -** राज्यातील बहुतांश भागात मुसळधार पाऊस सुरू असून राजधानी दिल्लीतही वातावरण बदलले. कारण, मान्सूनपूर्व पावसाच्या हजेरीने हवाई वाहतुकीवरही परिणाम झाला आहे. त्यातच, दिल्लीतून श्रीनगरला जाणारे विमान वादळी वाऱ्याच्या चपाट्यात आल्याने श्रीनगर विमानतळावर या विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करण्यात आले. त्यामुळे, या विमानातून प्रवास करणाऱ्या २२७ प्रवाशांची जीव भांड्यात पडला. विमान प्रवासी वाहतुकीत विमान कंपन्या आणि शासनाच्या उड्डाण मंत्रालयाकडून विशेष काळजी घेतली जाते. त्यात, पावसाळ्याच्या दिवसांत विमान कंपन्यांना व विमानसेवेला महत्त्वाचे संदेशही सातत्याने दिले जातात. त्यामुळेच, दिल्ली-श्रीनगर विमान प्रवासात सुदैवाने मोठी दुर्घटना टळली. इंडिगोच्या या विमानातील सर्वच २२७ प्रवासी सुखरुप असल्याचे विमान कंपनीकडून सांगण्यात आले आहे.

इंडिगो विमानच्या या उड्डाणाचे ट्रॅकिंग पाहिल्यास हे विमान वादळात सैरभैर झाल्याचं दिसून येत होते. आकाशातील वादळात विमान गोल गोल फिरत असल्याचे लक्षात येताच विमानातील क्रु मेंबर आणि पायलटच्या प्रसंगावधानतेमुळे विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करण्यात आले. एअरपोर्ट अधिकाऱ्यांच्या म्हणण्यांनुसार, विमानाचे इमर्जन्सी लँडिग करताना कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही, तसेच सर्व सूचना व मानकांचे पालन करण्यात आले आहे.

दिल्ली ते श्रीनगर हवाई मार्गावर विमानाचा प्रवास सुरू असताना, बर्फाचा पाऊस आणि गारा पडत होत्या. त्यामध्ये, विमानाच्या पुढील बाजुच्या काही भागाचे नुकसान झाले आहे.

## राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ३०० वी जयंतीनिमित्त भाजपाची जिल्हा कार्यशाळा मोठ्या उत्साहात संपन्न

# पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे कार्य घराघरात पोहोचवूया - जिल्हाध्यक्ष आ. कुचे

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टी जालना महानगर जिल्हा व जालना ग्रामीण जिल्हा तर्फे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्त (ता.२१) कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेश पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले आणि आयोजित केलेल्या प्रदर्शनी बघून कार्यकर्त्यांनी त्यांच्या जीवन कार्य आत्मसात केले. यावेळी भाजपा प्रदेश वक्ते किशोरजी शितोळे, सदस्य नोंदणी प्रभारी किरणजी पाटील, जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे, जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यशाळेस मार्गदर्शन करतांना प्रदेश वक्ते श्री.शितोळे म्हणाले की, पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मस्थान महाराष्ट्रातील असून अहिल्यानगर जिल्ह्यातील चौंडी या ठिकाणी आहे. अहिल्यादेवी यांचा जीवन प्रवास अत्यंत खडतर होता. अनेक संकटे त्यांच्यावर आली. परंतु त्यांनी न डगमगता धैर्याने या सर्व संकटांना तोंड दिले असे हि ते म्हणाले.

महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे म्हणाले की, पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी अनेक सामाजिक कामे केली, अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार केला, अनेक नद्यांवरील घाटांची दुरुस्ती केली, अनेक नवीन घाट बांधले, महिला सबल आणि सक्षम होण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. भारतीय जनता पार्टीतर्फे अनेक कार्यक्रमांचे आयोजन राबविण्यात येत आहेत. यामध्ये राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी निर्माण केलेले घाट, मंदिर, स्मारक यांची स्वच्छता करणे, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या जीवनावरील चित्ररथ, शोभायात्रा, महिला मेळावे, युवा मेळावे, महिला मॅरेथॉन, पथनाट्य, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या कार्यावर प्रभावित होऊन सामाजिक कार्य करणाऱ्या महिला व सोशल मीडियातील प्रभावी व्यक्ती यांचे संमेलन, राजमाता अहिल्यादेवी यांच्या जीवन व कार्यावर प्रदर्शनी करणे हे सर्व कार्यक्रम भाजपा पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी नागरिकांना सोबत घेऊन वरील सर्व कार्यक्रम चांगल्या पद्धतीने करावेत आणि राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आदरांजली द्यावी, असे आवाहन जिल्हाध्यक्ष श्री.दानवे यांनी यांनी केले.

जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे म्हणाले की, अहिल्यादेवींनी ३०० वर्षांपूर्वी दिलेले योगदान, जनविकासाची केलेली कामे राज्यभर पोहोचविण्याचा प्रयत्न मोदी सरकार आणि राज्यातील फडणवीस सरकार करत आहे. अहिल्यादेवींचे कार्य शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचविण्याचे ध्येय मनात ठेवून त्यांचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी आपला भाजपा परिवार कटिबद्ध आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे कार्य घराघरात पोहोचवूया; वारसा जपत समाजसेवेकरिता कटिबद्ध होऊया, पंतप्रधान श्री




नरेंद्रजी मोदी साहेब व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या संकल्पनेतून राजमाता अहिल्यादेवींच्या प्रेरणादायी कार्याच्या जागर २१ मे ते ३१ मे या कार्यकाळात आपणास संपूर्ण जिल्ह्याभरात राबवयाचे आहे. यासंदर्भात उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यावेळी प्रदेश निमंत्रित सदस्य राजेशजी राऊत, रामेश्वर पाटील भांदरगे, विजय कामड, विमलताई आगलावे, ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सोपान पेंढारकर, मा.जिल्हाध्यक्ष अशोक पांगारकर, सतीश जाधव, जिल्हा सरचिटणीस देविदास कुचे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा संध्याताई देठे, शुभांगीताई देशपांडे, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष भागवत बावणे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष भागवत बावणे, अरुणाताई जाधव, अश्विनी पवार, शारदा पांढरे, अर्चना सोसे, वैशाली कुटुंबे, छाया घोरभांड, दिपाली बिन्नीवाले सर्व नवनिर्वाचित मंडळ अध्यक्ष व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सूत्रसंचालन जिल्हा सरचिटणीस सुनील पवार यांनी केले तर आभार कपिल दहेकर यांनी मानले.

# काशी, मथुराच नव्हे, तर प्रत्येक मंदिर मुक्तीसाठी हिंदूंचा सहभाग अत्यावश्यक ! - अधिवक्ता विष्णु जैन

**फोंडा, गोवा (सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवलेनगरी) -** एकीकडे बहुसंख्य हिंदूंना धर्माच्या आधारावर कोणत्याच सुविधा मिळत नाही; याउलट अल्पसंख्यांक म्हणून अन्य धर्मियांना मात्र 'अल्पसंख्यांक आयोगा'कडून ३ हजार २०० कोटी रुपयांपेक्षा अधिक रुपयांच्या सुविधा मिळतात. उत्तर प्रदेश येथील अल्पसंख्याकांच्या एक वैद्यकीय शिक्षण संस्थेत प्रवेश मिळण्यासाठी हिंदू धर्मांतर करून प्रवेश घेत आहेत, इतकी गंभीर स्थिती आहे. 'वक्फ बोर्डा'त केवळ २ अहिंदू सदस्य घेतले, तर लगेच 'सरकार असे करू शकत नाही', असा न्यायालय निर्णय देते. अहिंदूंचे एकही प्रार्थस्थळ, श्रद्धास्थान सरकारच्या नियंत्रणात नाही, तर प्रत्येक राज्यातील विविध कायद्यांद्वारे हिंदूंची मंदिरे सरकारच्या नियंत्रणात आहेत. काशी-मुथरा येथील मंदिरांच्या मुक्तीचा कायदेशीर लढा आम्ही देत आहोत. केवळ हे पुरेसे नसून देशातील प्रत्येक मंदिर मुक्त करण्याच्या लढ्यात हिंदूंचा सहभाग अत्यावश्यक आहे, असे आवाहन सर्वोच्च न्यायालयाचे अधिवक्ता विष्णु शंकर जैन यांनी केले.

सनातन संस्थेने आयोजित केलेल्या 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'त ते बोलत होते. या प्रसंगी 'सेव कल्चर सेव भारत फाऊंडेशन'चे श्री. उदय माहुरकर, चंडीगढ येथील लेखक आणि विचारवंत श्री. नीरज अत्री, तसेच हिंदु जनजागृती समितीचे श्री. रमेश शिंदे आणि सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक उपस्थित होते. या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते 'हिंदु राष्ट्र का हवे ?' या 'ई' बुकचे प्रकाशन करण्यात आले. माजी केंद्रीय माहिती आयुक्त श्री. उदय माहुरकर म्हणाले की, सध्या सोशल मीडिया, 'ओटीटी', चित्रपट यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक आक्रमण होत आहे. पॉर्नोग्राफीमुळे बलात्काराचे प्रमाण वाढत आहे. हा राक्षस मोबाईलच्या माध्यमातून आता घराघरांत पोहोचला आहे. सनातन संस्कृती, पुढील पिढी वाचण्यासाठी हे सांस्कृतिक आक्रमण रोखणे आवश्यक आहे. तर चंडीगढ येथील लेखक आणि विचारवंत श्री. नीरज अत्री म्हणाले की, सध्या समाजात पाश्चिमात्यांचे अंधानुकरण करण्यात अनेक जण धन्यता मानत आहेत. सनातन संस्कृतीच्या रक्षणासाठी हिंदूंच्या डोक्यावर बसलेले पाश्चिमात्यांच्या अंधानुकरणाचे भूत उतरवणे आवश्यक आहे.



या वेळी हिंदु जनजागृती समितीचे श्री. रमेश शिंदे म्हणाले की, बांगलादेशात सरकारविरोधी आंदोलनात हिंदूंनाच मारण्यात आले. काश्मीर, केरळ आणि बंगाल येथून हिंदूच संपत चालले आहेत. नुकत्याच पहलगाम येथेही धर्म विचारून हिंदूंच्या हत्या करण्यात आल्या. प्रत्येक ठिकाणी हिंदूंनाच लक्ष्य केल्या जात आहे. त्यामुळे आता केवळ जागृती करत बसण्यापेक्षा त्यावर उपाययोजना करणे आवश्यक आहे. समर्थ रामदासस्वामींनी यांच्याप्रमाणे आज आपले संत जागृती करत असल्याने आपल्यालाही या सनातन राष्ट्र शंखनादाच्या माध्यमातून सनातन राष्ट्राच्या स्थापनेसाठी लढण्यासाठी सिद्ध व्हावे लागेल.

## प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे समाजरत्न पुरस्काराने सन्मानित

**पाचोड । प्रतिनिधी -** धुळे येथे आयोजित केलेल्या श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्था आणि इंडो ग्लोबल व्हिजन सोशल डेव्हलपमेंट गुरुकुल फौंडेशनतर्फे दिला जाणारा राष्ट्रीय सन्मानाचा समाजरत्न पुरस्कार २०२५ पाचोड येथील शिवछत्रपती कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांना धुळे येथील श्री शिवाजी विद्या प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील सभागृहामध्ये मानचिन्ह व मानपत्र देऊन सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

श्री शिवाजी विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. संजय पाटील, उपाध्यक्ष डॉ. प्रफुल्लकुमार सिसोदे, रियल इंडो ग्लोबल व्हिजन सोशल डेव्हलपमेंट गुरुकुल फौंडेशनचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. मनोहर पाटील, सचिव प्रा. डॉ. संभाजी पाटील, कार्याध्यक्ष प्रा. डॉ. प्रमोद पवार, सहसचिव डॉ. मोहन पवार, प्राचार्य डॉ. पी. डी. देवरे, डॉ. दिलीप पाटील यांच्या शुभहस्ते डॉ. चंद्रसेन कोठावळे यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

मत्स्योदरी शिक्षण संस्थेत प्रदीर्घ सदतीस वर्षे विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून उत्तम सेवा बजावलेले डॉ. चंद्रसेन कोठावळे हे मागील तीन वर्षांपासून पाचोड येथील शिवछत्रपती महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून यशस्वीपणे कार्य करत आहेत. मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. खा. अंकुशराव टोपे व मा. पालकमंत्री राजेश टोपे यांच्या हस्ते डॉ. चंद्रसेन कोठावळे यांना मत्स्योदरी सेवा गौरव पुरस्कारही प्रदान करण्यात आलेला आहे.

## आश्वी खुर्दच्या कर्मवीर भाऊराव पा. विद्यानिकेतन मधे कर्मचा-यांचा सेवापूर्ती कृतज्ञता सोहळा संपन्न

**मुंबई । प्रतिनिधी -** आश्वी खुर्द ता संगमनेर येथील लोकनेते डॉ.बाळासाहेब विखे पा ( पद्मभूषन उपाधिने सन्मानीत ) प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यानिकेतन व कनिष्ठ महाविद्यालयात उपमुख्यध्यापीका सौ. अलका तांबे मॅडम , राज्यस्तरीय आदर्श ग्रंथपाल पुरस्कार प्राप्त श्री.उल्हास देव्हारे सर ,कनिष्ठ महाविद्यालयाचे उपशिक्षक श्री. राजेंद्र चौधरी सर , माध्यमीकचे उपशिक्षक श्री. अनिलकुमार डांगे सर , विज्ञान परिचर श्री. बाळासाहेब वाबळे यांचा सेवापूर्ती कृतज्ञता सोहळा उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा समितीचे अध्यक्ष श्री. आण्णासाहेब भोसले पाटील होते. , तर प्रमुख अतीथी संस्थेच्या शिक्षण संचालिका सौ. लिलावती सरोदे मॅडम व संचालक डॉ.प्रदिप दिघे सर सर उपस्थीत होते, प्रथम अतीथी व सेवानिवृत्त होणा-या सेवकांच्या हस्ते पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पा. व पद्मभूषन डॉ. बाळासाहेब विखे पा. यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन केले, त्यानंतर प्रमुख अतीथीच्या शुभहस्ते सेवानिवृत्त कर्मचा-यांचा सत्कार करुन, सन्मानपत्र देउन गौरविण्यात आले नियत वयोमानानुसार कर्मचारी सेवानिवृत्त होत असतातच, त्याच प्रमाणे आश्वी खुर्दच्या या शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचा-यांमुळे आजपर्यंत अनेक विद्यार्थी चांगल्या पदावर पोहचले, ग्रंथपाल देव्हारे सरांनी 'जॉय ऑफ गिव्हिग' या मुंबई येथील सामाजीक संस्थेचा २०२५ चा , पारस व संवर्धिनी या संस्थांचे राज्यस्तरीय आदर्श ग्रंथपाल पुरस्कार मिळवुन संस्थेच्या व शाळेच्या नाव लौकीकात नेहमीच भर टाकली आहे, या पुढील त्यांचे आयुष्य आनंदी ,सुख समृद्धीचे व आरोग्यदायी जाओ हि साईचरणी प्रार्थना करते असे मनोगत शिक्षण संचालिका सौ. सरोदे मॅडम यांनी व्यक्त केले व शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रास्तवीक प्राचार्य श्री. सयराम शेळके सरांनी करून सर्वाचे स्वागत केले , पर्यवेक्षिका सौ.माधुरी सातपुते मॅडम यांनी सेवानिवृत्त कर्मचा-यांच्या कार्याची माहिती दिली. सेवानिवृत्त होणा-या उपमुख्यध्यापीका सौ तांबे मॅडम , चौधरी सर , देव्हारे सर यांनी आपले मनोगत व्यक्त करुन कृतज्ञता व्यक्त केली व सर्वाचे आभार मानले, सेवनिवृत्त कर्मचा-यांनी सी.ई.टी. पुस्तकांचा संच विद्यालयास संप्रेम भेट दिला. या कार्यक्रमास सरपंच सौ.अलका गायकवाड , बापुसाहेब गायकवाड पा , विठ्ठल वर्पे सर,डॉ. दिनकर गायकवाड पा, मनीषा लुनीया ,डॉ. बाळासाहेब आंधळे , संपत कुटे सर, मुस्ताक शेख सर, डॉ. आण्णासाहेब तांबे सर, शंकर गाडेकर आदि ग्रामस्त,शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थीत होते.सुत्रसंचलन सौ.मोना निचळ मॅम यांनी केले तर आभार सौ. अंजुम शेख मॅडम यांनी मानले.शेवटी विद्यार्थी व उपस्थीत सर्वांनी भोजनाचा स्वाद घेतला.

### जाहीर प्रगटन

जा.क्र. २०२०/नपप/नामांतर नोंद/जाक्र/कावि
दिनांक ०४/०५/२०२५

**कार्यालय नगर परिषद, परतूर**
**जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **अप्पासाहेब बाबासाहेब आढळकर रा. परतूर,** ता. परतूर जि. जालना यांनी नामे रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र. ३११६/२०१७ **दि २४/१०/२०१७** सत्यप्रत जोडून आवक क्र.**- १०५१/२५ दि २/०५/२५** रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/ श्रीमती **राजकुकार ब्रिजलाल होलाणी** रा. **परतूर** जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं./ सर्व्हे नं. १४९/२ ज्याचा मिळकत क्र ४१४९ चे भुखंड मधील क्षेत्र ज्यांची चतुःसिमा पुर्व- प्लॉट ३९ नपमाक्र ४०८७, पश्चिम किसन सवणे घर, दक्षिण- प्लॉट ४० ओपनस्पेस, उत्तर- १५ मी रोड यावरील चतुःसिमा मधील **१६.३६ चौ. फुट** जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसांच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीन व शिक्काने दिले आहे.

**मुख्याधिकारी, स्वाक्षरी, नगर परिषद, परतूर**

### जाहीर प्रगटन

जा.क्र. २०२०/नपप/नामांतर नोंद/जाक्र/कावि
दिनांक २०/०५/२०२५

**कार्यालय नगर परिषद, परतूर**
**जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **सुरेखा राजु लोणके रा. परतूर,** ता. परतूर जि. जालना यांनी नामे रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र. **दि १४/२/२०१८** सत्यप्रत जोडून आवक क्र.**-** रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/ श्रीमती **बाबासाहेब माणिकराव काळे** रा. **परतूर** जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं./ सर्व्हे नं. ज्याचा मिळकत क्र ३६६६ पैकीचे भुखंड मधील क्षेत्र ज्यांची चतुः सिमा पुर्व- मिळकत न ९, पश्चिम रस्ता, दक्षिण- मि नं ९, उत्तर- मि.न १ यावरील चतुःसिमा मधील **२०x३० फुट** जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसांच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीन व शिक्काने दिले आहे.

**मुख्याधिकारी, स्वाक्षरी, नगर परिषद, परतूर**

### जाहीर प्रगटन

जा.क्र. २०२०/नपप/नामांतर नोंद/जाक्र/कावि
दिनांक २५/०४/२०२५

**कार्यालय नगर परिषद, परतूर**
**जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **ज्ञानेश्वर सुभाष उल्हारे रा. वलखेड,** ता. परतूर जि. जालना यांनी नामे रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र. १२०४/२०२५ **दि २४/०४/२०२५** सत्यप्रत जोडून आवक क्र.**- १०५०/२५ दि २/०५/२५** रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/ श्रीमती **रब्बानी शेख महेबुब** रा. **परतूर** जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं./ सर्व्हे नं. १६०/३ ज्याचा मिळकत क्र चे भुखंड मधील क्षेत्र ज्यांची चतुःसिमा पुर्व- अंतर्गत रस्ता, पश्चिम लिहून घेणार यांची मालमत्ता, दक्षिण- बळीराम सुरुंग, उत्तर- बळीराम सुरुंग यावरील चतुःसिमा मधील **८७.१९५६ चौ. मीटर** जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसांच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीन व शिक्काने दिले आहे.

**मुख्याधिकारी, स्वाक्षरी, नगर परिषद, परतूर**

### जाहीर प्रगटन

जा.क्र. २०२०/नपप/नामांतर नोंद/जाक्र/कावि
दिनांक १३/०५/२०२५

**कार्यालय नगर परिषद, परतूर**
**जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **अविनाश अच्युतराव मस्के** रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांनी नामे रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र. २४७१/२०१८ **दि १२/०७/२०१८** सत्यप्रत जोडून आवक क्र.१०९७**- दि १४/५/२०२५** रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/ श्रीमती **सविता निलेश काबरा व सांडू धोंडीबा थोटे** रा. **परतूर** जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं. / सर्व्हे नं. ४८८ नवा ज्याचा मिळकत क्र २१५७ मधील क्षेत्र ज्यांची चतुःसिमा पुर्व- मिळकत क्र ६३, पश्चिम- रस्ता, दक्षिण- मि.क्र.६५, उत्तर- मिक्र. ६७ यावरील चतुःसिमा मधील **५७.७६ चौमि.** जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसांच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीन व शिक्काने दिले आहे.

**मुख्याधिकारी, स्वाक्षरी, नगर परिषद, परतूर**

### जाहीर प्रगटन

जा.क्र. २०२०/नपप/नामांतर नोंद/जाक्र/कावि
दिनांक ९/०५/२०२५

**कार्यालय नगर परिषद, परतूर**
**जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **निलेश रत्नाकर भागवते** आनंदनगर रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांनी नामे रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र. ४२७/२०२४ **दि २१/०२/२०२४** सत्यप्रत जोडून आवक क्र.९८९**- दि २३/४/२०२५** रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/ श्रीमती **विष्णु कामाजी गोरे** रा. **परतूर** जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं. / सर्व्हे नं. ज्याचा मिळकत क्र ५८२२ मधील प्लॉट क्र ७४ व ७५ क्षेत्र ज्यांची चतुःसिमा पुर्व- प्लॉट क्र ७२ व ७३, पश्चिम- ६ मी रस्ता, दक्षिण- ६ मी रस्ता, उत्तर- जिजा गोरे शेतजमिन यावरील चतुःसिमा मधील **१०९.९३८ चौमि.** जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसांच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीन व शिक्काने दिले आहे.

**मुख्याधिकारी, स्वाक्षरी, नगर परिषद, परतूर**

### जाहीर प्रगटन

जा.क्र. २०२०/नपप/नामांतर नोंद/जाक्र/कावि
दिनांक ९/०५/२०२५

**कार्यालय नगर परिषद, परतूर**
**जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **विलास रत्नाकर भागवते** आनंदनगर रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांनी नामे रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र. ४२५/२०२४ **दि २१/०२/२०२४** सत्यप्रत जोडून आवक क्र.९९०**- दि २३/४/२०२५** रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/ श्रीमती **विष्णु कामाजी गोरे** रा. **परतूर** जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं. / सर्व्हे नं. ज्याचा मिळकत क्र ५८२२ मधील प्लॉट क्र ७२ व ७३ क्षेत्र ज्यांची चतुःसिमा पुर्व- ६ मी रस्ता, पश्चिम- प्लॉट क्र ७४ व ७५, दक्षिण- ६ मी रस्ता, उत्तर- जिजा गोरे शेतजमिन यावरील चतुःसिमा मधील **१०९.६८० चौमि.** जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसांच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीन व शिक्काने दिले आहे.

**मुख्याधिकारी, स्वाक्षरी, नगर परिषद, परतूर**

### जाहीर प्रगटन

जा.क्र. २०२०/नपप/नामांतर नोंद/जाक्र/कावि
दिनांक १९/०५/२०२५

**कार्यालय नगर परिषद, परतूर**
**जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **अब्दुल करीम अ.रहीम कुरेशी** रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांनी नामे रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र. **दि २८/०४/२०२५** सत्यप्रत जोडून आवक क्र.**- दि २०/०४/२५** रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/ श्रीमती **हुसेना अ. रहीम कुरेशी** रा. **परतूर** जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं. / सर्व्हे नं. ज्याचा मिळकत क्र चे भुखंड ७/७ मधील क्षेत्र ज्यांची चतुःसिमा पुर्व- असलम अ. रहीम कुरेशी, पश्चिम- फारुख कुरेशी, दक्षिण- रस्ता, उत्तर- आजुक कुरेशी यावरील चतुःसिमा मधील **३५ x १७, फुट** जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसांच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीन व शिक्काने दिले आहे.

**मुख्याधिकारी, स्वाक्षरी, नगर परिषद, परतूर**

### जाहीर प्रगटन

जा.क्र. २०२०/नपप/नामांतर नोंद/जाक्र/कावि
दिनांक १९/०५/२०२५

**कार्यालय नगर परिषद, परतूर**
**जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **असलम अब्दुल रहिम कुरेशी** रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांनी नामे रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र. **दि २८/०४/२०२५** सत्यप्रत जोडून आवक क्र.**- दि २०/०४/२५** रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/ श्रीमती **हुसेना अ. रहीम कुरेशी** रा. **परतूर** जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं. / सर्व्हे नं. ज्याचा मिळकत क्र चे भुखंड मधील क्षेत्र ज्यांची चतुः सिमा पुर्व- रस्ता, पश्चिम- अब्दुल रहीम, दक्षिण- रस्ता, उत्तर- आजुक कुरेशी यावरील चतुःसिमा मधील **३५ x १७, फुट** जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसांच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीन व शिक्काने दिले आहे.

**मुख्याधिकारी, स्वाक्षरी, नगर परिषद, परतूर**

### जाहीर प्रगटन

जा.क्र. २०२०/नपप/नामांतर नोंद/जाक्र/कावि
दिनांक १९/०५/२०२५

**कार्यालय नगर परिषद, परतूर**
**जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **शारदा देविलाल जोशी** रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांनी नामे रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र. **शपथपत्र दि ०५/०२/२०२५** सत्यप्रत जोडून आवक क्र.**- १०९९ दि १४/०५/२५** रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/ श्रीमती **शांताबाई देवीलाल शर्मा** रा. **परतूर** जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं. / सर्व्हे नं. ज्याचा मिळकत क्र चे भुखंड **घ.नं. २२८२** मधील क्षेत्र ज्यांची चतुःसिमा पुर्व- अरुण धुमाळ, पश्चिम- रस्ता, दक्षिण- अंभुरे पंडीतराव, उत्तर- स्वामी यावरील चतुः सिमा मधील **१३ x १८, फुट** जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसांच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीन व शिक्काने दिले आहे.

**मुख्याधिकारी, स्वाक्षरी, नगर परिषद, परतूर**

### जाहीर प्रगटन

जा.क्र. २०२०/नपप/नामांतर नोंद/जाक्र/कावि
दिनांक १९/०५/२०२५

**कार्यालय नगर परिषद, परतूर**
**जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **मीनाबाई ममहेश सांगुळे** रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांनी नामे रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र. **वारसाने दि ०८/०५/२०२५** सत्यप्रत जोडून आवक क्र.**- १०९८ दि १४/०५/२५** रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/ श्रीमती **महेश दगडु सांगुळे** रा. **परतूर** जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं. / सर्व्हे नं. ज्याचा मिळकत क्र चे भुखंड **घ.नं. २१७९** मधील क्षेत्र ज्यांची चतुःसिमा पुर्व-, पश्चिम, दक्षिण-, उत्तर- यावरील चतुःसिमा मधील **११ x ११, २०x११ फुट** जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसांच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीन व शिक्काने दिले आहे.

**मुख्याधिकारी, स्वाक्षरी, नगर परिषद, परतूर**

# स्वामी विवेकानंद सहकारी पतसंस्थेतर्फे दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**जालना । प्रतिनिधी -** स्वामी विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्थेच्या विविध शाखांतर्फे परिसरातील शाळांमधील दहावीच्या परीक्षेत प्रथम, द्वितीय, तृतीय आलेले विद्यार्थी आणि सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार करण्यात आला.



मुख्य शाखेचे व्यवस्थापक सौ. सपना जनसारी, बदनापूर शाखेचे महेश देव, राजुर शाखेचे सचिन सातपुते, राम नगर आणि सेवली शाखेचे ऋषिकेश कऱ्हाळे, गोलापांगरी शाखेचे अक्षय श्रीरामवार, अंबड चौफुली शाखेच्या पूजा धांडे, शहागड शाखेचे हनुमान पांचाळ, अंबड शाखेचे अनिल जाधव, चंदनझिरा शाखेचे जय राऊत, जाफ्राबाद शाखेचे सुरज ढोबळे, मंठा चौफुली शाखेचे आबासाहेब भोसले आणि कर्मचाऱ्यांनी संबंधित परिसरातील शाळांमध्ये गुणवंत विद्यार्थी तसेच सभासदांच्या घरी जाऊन त्यांच्या गुणवंत पाल्यांचा भेटवस्तू देऊन सत्कार केला व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यामध्ये कु.राधिका टाकळकर (९६ टक्के), कु.अक्षरा चौधरी (९४.६७ टक्के), प्रणव मनोज दरबस्तवार (९५ टक्के), कु. श्रावणी संतोष रेगुडे(९३ टक्के),कु.प्रीतम जोशी (९३ टक्के), कु. सरस्वती वशिष्ठ कोल्हे (९०.२० टक्के), ऋषिकेश ढवळे (८९.४० टक्के), कु. गौरी संजय देव (९५ टक्के) आदी ६५ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. तसेच इयत्ता बारावीच्या परीक्षेत ९४.६७ टक्के गुण संपादन करून जालना जिल्ह्यातून द्वितीय आलेल्या कु. अक्षरा चौधरी हिचाही मुख्य शाखेत पेन व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

सौ. सपना जनसारी म्हणाल्या की, स्वामी विवेकानंद सहकारी पतसंस्था ही केवळ आर्थिक व्यवहारापुरती मर्यादित न राहता समाजातील कर्तृत्ववान आणि प्रेरणादायी घटकांना प्रोत्साहन देण्यासाठी कायम पुढाकार घेत असते. सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून हा कार्यक्रम राबविण्यात आला असून, भविष्यातही असे कार्यक्रम सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. पालकांनी पतसंस्थेच्या या सामाजिक उपक्रमाचे भरभरून कौतुक केले.

## वाल्मिकी नगर मंडल अध्यक्षपदी श्रीमती मनिषा खंदारे यांची नियुक्ती!

**मुंबई । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टी धारावी विधानसभेच्या मंडल अध्यक्षाच्या नियुक्त्या नुकत्याच जाहीर करण्यात आल्या. भाजपा मुंबई अध्यक्ष आ.ड.आशिष शेलार यांनी



या नियुक्त्या जाहीर केल्या असून धारावीतील वाल्मिकी नगर मंडल अध्यक्षपदी श्रीमती मनिषा दिलीप खंदारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच काळा किल्ला मंडल अध्यक्षपदी श्री अरुण जैसवाल तर कुंभारवाडा -कांबादेवी नगर मंडल अध्यक्षपदी श्री रमेश एन नाडार यांची नियुक्ती केली असून त्याचा या निवडीने विविध क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव करण्यात येत आहे.

सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव !

## ‘सव्यासची गुरुकुलम’च्या शौर्यप्रदर्शनाने शंखनाद महोत्सवात निर्माण केला वीरश्री!

**फोंडा, गोवा (सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवलेनगरी) -** सनातन संस्थेतर्फे आयोजित ‘सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव’ या भव्य धार्मिक-सांस्कृतिक महोत्सवात कोल्हापूरस्थित ‘सव्यासची गुरुकुलम’ संस्थेने युद्धकला, स्वसंरक्षण आणि शौर्यप्रदर्शनाचे सजीव अन् रोमांचक प्रात्यक्षिक सादर केले. त्यातून महोत्सवात सहभागी झालेल्यांमध्ये वीरश्री निर्माण झाली.



यामध्ये ‘पारंपरिक मैदानी खेळ आणि युद्धकला तंत्र’; ‘शिवकालीन शौर्यप्रदर्शन व अंगकौशल्य’; ‘महिलांवर होणाऱ्या छेडछाडीच्या प्रसंगी तिने कशाप्रकारे आत्मरक्षण करावे याचे वास्तवदर्शी प्रात्यक्षिक’; ‘अनेकांनी मिळून महिलेवर आक्रमण केल्यास तीने कशा प्रकारे धैर्याने लढा द्यावा, याचे सजीव दर्शन’ या सादरीकरणामुळे उपस्थित प्रेक्षकांच्या मनात वीरश्रीची आणि आत्मरक्षणाची जाणीव प्रबळ झाली. असे प्रशिक्षण सर्वांनी घेणे आवश्यक आहे, असा संदेश या सादरीकरणातून प्रभावीपणे पोहोचला.

या वेळी श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंददेव गिरीजी यांनी आपल्या भाषणात सांगितले, प्रत्येक संतांनी आपल्या शिष्यांना अशा प्रकारचे युद्धकला आणि आत्म संरक्षणाचे प्रशिक्षण द्यावे.

हा महोत्सव तब्बल वीस हजारांहून अधिक धर्मप्रेमी नागरिक, तसेच अनेक संत, महंत व आध्यात्मिक मार्गदर्शकांच्या उपस्थितीत पार पडला. या सजीव युद्धकला सादरीकरणाने महोत्सवातील वातावरण अधिक उर्जादायी व प्रेरणादायक बनवले. सव्यासची गुरुकुलम ही संस्था युवकांमध्ये आत्म विश्वास, राष्ट्रप्रेम आणि सनातन शौर्यपरंपरेची बीजे रोवण्याचे कार्य करत आहे.

### जाहीर प्रगटन

जा.क्र. २०२०/नपप/नामांतर नोंद/जाक्र/कावि
दिनांक १९/०५/२०२५

**कार्यालय नगर परिषद, परतूर जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **शालीकराम रामेश्वर वाघमारे** रा. **परभणी** ता. जि. परभणी यांनी नामे रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र. **दि ०३/०५/२०१९** सत्यप्रत जोडून आवक क्र.- रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/ श्रीमती **प्रसन्नकुमार बळवंतराव कुलकर्णी** रा. **परतूर** जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं. / सर्व्हे नं.१७१/२ ज्याचा मालमत्ता क्र ४१२९ मधील क्षेत्र ज्यांची चतुःसिमा पुर्व- १५ फुट रस्ता, पश्चिम- मिळकत क्र ५७, दक्षिण- मि.क्र.५२, उत्तर- मिक्र. ५४ यावरील चतुःसिमा मधील **३० x २०, फुट** जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसांच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीन व शिक्काने दिले आहे.

**मुख्याधिकारी, स्वाक्षरी, नगर परिषद, परतूर**

### जाहीर प्रगटन

जा.क्र. २०२०/नपप/नामांतर नोंद/जाक्र/कावि
दिनांक २०/०५/२०२५

**कार्यालय नगर परिषद, परतूर जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **महादेव तुकाराम राऊत रा. परतूर,** ता. परतूर जि. जालना यांनी नामे रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र. **दि २४/२/२०२५** सत्यप्रत जोडून आवक क्र.**- दि २०/०५/२५** रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/ श्रीमती **ज्ञानेश्वर आत्माराम राऊत** रा. **परतूर** जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं./ सर्व्हे नं. ज्याचा मिळकत क्र ३६४ चे भुखंड मधील क्षेत्र ज्यांची चतुःसिमा पुर्व- महादेव राऊत, पश्चिम धोंडीराम राऊत, दक्षिण- शेषराव जाधव, उत्तर- रस्ता यावरील चतुःसिमा मधील **२२x१२ फुट** जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसांच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीन व शिक्काने दिले आहे.

**मुख्याधिकारी, स्वाक्षरी, नगर परिषद, परतूर**

### जाहीर प्रगटन

जा.क्र. २०२०/नपप/नामांतर नोंद/जाक्र/कावि
दिनांक १३/०५/२०२५

**कार्यालय नगर परिषद, परतूर जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **बळीराम सखाराम सुरुंग** रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांनी नामे रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र. १२०३/२५ **दि २४/०४/२०२३** सत्यप्रत जोडून आवक क्र.१०४२**- दि ३०/४/२०२५** रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/ श्रीमती **रब्बानी शेख महेबुब** रा. **परतूर** जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं. / सर्व्हे नं. १६०/३ नवा ज्याचा मिळकत क्र प्लॉटक्र. २ च ३ ची चतुसिमा मधील क्षेत्र ज्यांची चतुःसिमा पुर्व- अंतर्गत रोड, पश्चिम- आष्टी परतूर रोड, दक्षिण- अशोक आघाव, उत्तर- ज्ञानरेश्वर उव्हारे यावरील चतुःसिमा मधील **५७.१६७२ चौमि.** जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसांच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीन व शिक्काने दिले आहे.

**मुख्याधिकारी, स्वाक्षरी, नगर परिषद, परतूर**

### जाहीर प्रगटन

जा.क्र. २०२०/नपप/नामांतर नोंद/जाक्र/कावि
दिनांक ०९/०५/२०२५

**कार्यालय नगर परिषद, परतूर जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **रेणुका अशोक चिकणे** रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांनी नामे रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र. २२३/२५ **दि २४/४/२०२५** सत्यप्रत जोडून आवक क्र.**- १०२९ दि २९/०४/२५** रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/ श्रीमती **प्रयागबाई चिकणे** रा. **परतूर** जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं. / सर्व्हे नं. ज्याचा मिळकत क्र ४८६२/१/१ चे भुखंड मधील क्षेत्र ज्यांची चतुःसिमा पुर्व-, शेख अकबर, पश्चिम रोड, दक्षिण-प्रयागबाई चिकणे, उत्तर- मा.क्र.४८७० यावरील चतुःसिमा मधील **१३ x २०, फुट** जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसांच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीन व शिक्काने दिले आहे.

**मुख्याधिकारी, स्वाक्षरी, नगर परिषद, परतूर**

### जाहीर प्रगटन

जा.क्र. २०२०/नपप/नामांतर नोंद/जाक्र/कावि
दिनांक ०४/०५/२०२५

**कार्यालय नगर परिषद, परतूर जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **नारायण वैजनाथ लिपणे रा. परतूर,** ता. परतूर जि. जालना यांनी नामे रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र. ९८५ **दि ४/४/२०२५** सत्यप्रत जोडून आवक क्र.**- १०५२/२५ दि २/०५/२५** रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/ श्रीमती **अमजद वहाब कुरेशी** रा. **परतूर** जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं./ सर्व्हे नं. १०३/१ ज्याचा मिळकत क्र ३७६४ चे भुखंड मधील क्षेत्र ज्यांची चतुःसिमा पुर्व- हरिभाऊ मारोतराव मोगल, पश्चिम ६.१०मी रस्ता, दक्षिण- सेलू परतूर रोड, उत्तर- ६.१० मी रस्ता यावरील चतुःसिमा मधील **४४६ चौ. मीटर** जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसांच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीन व शिक्काने दिले आहे.

**मुख्याधिकारी, स्वाक्षरी, नगर परिषद, परतूर**

### जाहीर प्रगटन

जा.क्र. २०२०/नपप/नामांतर नोंद/जाक्र/कावि
दिनांक २०/०५/२०२५

**कार्यालय नगर परिषद, परतूर जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **महादेव रामकिसन राऊत रा. परतूर,** ता. परतूर जि. जालना यांनी नामे रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र. **दि १५/१/२०२३** सत्यप्रत जोडून आवक क्र.**- दि २०/०५/२५** रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/ श्रीमती **शंकर तुकाराम राऊत** रा. **परतूर** जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं./ सर्व्हे नं. ज्याचा मिळकत क्र ३६५ चे भुखंड मधील क्षेत्र ज्यांची चतुःसिमा पुर्व- अफसर कामखानी, पश्चिम ज्ञानेश्वर, दक्षिण- रामकिसन राऊत, उत्तर- रस्ता यावरील चतुःसिमा मधील **२२x१२ फुट** जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसांच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीन व शिक्काने दिले आहे.

**मुख्याधिकारी, स्वाक्षरी, नगर परिषद, परतूर**

### जाहीर प्रगटन

जा.क्र. २०२०/नपप/नामांतर नोंद/जाक्र/कावि
दिनांक ०९/०५/२०२५

**कार्यालय नगर परिषद, परतूर जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **सरिता आनंदसिंग हजारी** रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांनी नामे रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र. ३३१/२५ **दि २५/३/२०२५** सत्यप्रत जोडून आवक क्र.**- १०६४ दि ६/०५/२५** रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/ श्रीमती **आनंदसिंह लक्ष्मणसिह हजारी** रा. **परतूर** जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं. / सर्व्हे नं. १३४/५ ज्याचा मिळकत क्र ४१२६ चे भुखंड मधील क्षेत्र ज्यांची चतुःसिमा पुर्व-, रोड, पश्चिम शिवाजी गाढवे, दक्षिण-रस्ता, उत्तर- विकणाऱ्याची जागा यावरील चतुःसिमा मधील **१६.७० x १२.५, मीटर** जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसांच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीन व शिक्काने दिले आहे.

**मुख्याधिकारी, स्वाक्षरी, नगर परिषद, परतूर**

### जाहीर प्रगटन

जा.क्र. २०२०/नपप/नामांतर नोंद/जाक्र/कावि
दिनांक ०९/०५/२०२५

**कार्यालय नगर परिषद, परतूर जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **राजनंदनी संजय अंभुरे खांडवी वाडी** रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांनी नामे रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र. ११८/२५ **दि २४/४/२०२५** सत्यप्रत जोडून आवक क्र.**- १०३ दि २९/०४/२५** रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/ श्रीमती **निवृत्ती तुकाराम बिडवे** रा. **परतूर** जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं. / सर्व्हे नं. १५०/५ ज्याचा मिळकत क्र २४७८ चे भुखंड मधील क्षेत्र ज्यांची चतुःसिमा पुर्व- प्लॉट नं २०, पश्चिम प्लॉ नं. २२, दक्षिण- रस्ता, उत्तर- रस्ता यावरील चतुःसिमा मधील **१३५ चौ. मीटर** जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसांच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीन व शिक्काने दिले आहे.

**मुख्याधिकारी, स्वाक्षरी, नगर परिषद, परतूर**

### जाहीर प्रगटन

जा.क्र. २०२०/नपप/नामांतर नोंद/जाक्र/कावि
दिनांक ०९/०५/२०२५

**कार्यालय नगर परिषद, परतूर जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **अशोक दशरथ हिवाळे** रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांनी नामे रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र. २७९८/१५ **दि २४/११/२०१५** सत्यप्रत जोडून आवक क्र.**- १७४/२५ दि ९/०५/२५** रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/ श्रीमती **शेख उमर शे, साहेबराव** रा. **परतूर** जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं./ सर्व्हे नं. १४२/५ ज्याचा मिळकत क्र ४२३८ चे भुखंड मधील क्षेत्र ज्यांची चतुःसिमा पुर्व- विक्रेत्याची जागा, पश्चिम रस्ता, दक्षिण- विक्रेत्याची जागा, उत्तर- विक्रेत्याची जागा यावरील चतुःसिमा मधील **७४.३४ चौ. मीटर** जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसांच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीन व शिक्काने दिले आहे.

**मुख्याधिकारी, स्वाक्षरी, नगर परिषद, परतूर**

### जाहीर प्रगटन

जा.क्र. २०२०/नपप/नामांतर नोंद/जाक्र/कावि
दिनांक ०९/०५/२०२५

**कार्यालय नगर परिषद, परतूर जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **प्रकाश रामा झाकणे** रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांनी नामे रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र. २१२८/२०१९ **दि १५/७/२०१९** सत्यप्रत जोडून आवक क्र.**- १०३२/२५ दि २९/०४/२५** रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/ श्रीमती **बबीता कैलास डोमाळ** रा. **परतूर** जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं./ सर्व्हे नं. १८७/२ ज्याचा मिळकत क्र ४९८८ चे भुखंड ४२ मधील क्षेत्र ज्यांची चतुःसिमा पुर्व- मि.क्र.५५, पश्चिम रस्ता, दक्षिण- मि.क्र.४१, उत्तर- मि.क्र.४३ यावरील चतुःसिमा मधील **९४.५१ चौ. मीटर** जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसांच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीन व शिक्काने दिले आहे.

**मुख्याधिकारी, स्वाक्षरी, नगर परिषद, परतूर**

### जाहीर प्रगटन

जा.क्र. २०२०/नपप/नामांतर नोंद/जाक्र/कावि
दिनांक ०९/०५/२०२५

**कार्यालय नगर परिषद, परतूर जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **सुभाष रामा झाकणे** रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांनी नामे रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र. २१३०/२०१९ **दि १५/७/२०१९** सत्यप्रत जोडून आवक क्र.**- १०३/२५ दि २९/०४/२५** रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/ श्रीमती **बबीता कैलास डोमाळ** रा. **परतूर** जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं./ सर्व्हे नं. १८७/२ नवा ज्याचा मिळकत क्र ४९९० चे भुखंड मधील क्षेत्र ज्यांची चतुःसिमा पुर्व- मि.क्र.५३, पश्चिम रस्ता, दक्षिण- मि.क्र.४३, उत्तर- मि.क्र. ४५ यावरील चतुःसिमा मधील **९२.५१ चौ. मीटर** जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसांच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीन व शिक्काने दिले आहे.

**मुख्याधिकारी, स्वाक्षरी, नगर परिषद, परतूर**

### जाहीर प्रगटन

जा.क्र. २०२०/नपप/नामांतर नोंद/जाक्र/कावि
दिनांक ०९/०५/२०२५

**कार्यालय नगर परिषद, परतूर जि. जालना**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **भानुदास केदारी वाघ** रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांनी नामे रा. **परतूर** ता. परतूर जि. जालना यांच्याकडून नोंद नामांतर करणे बाबत रजिस्टर दस्त क्र. ९७४/२१ **दि २३/३/२०२१** सत्यप्रत जोडून आवक क्र.**- १०३० दि २९/०४/२५** रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/ श्रीमती **राजेश सुभाष अग्रवाल व इतर ३** रा. **परतूर** जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं. / सर्व्हे नं. १२८/२, १२८/३ ज्याचा मिळकत क्र ५४०१ चे भुखंड मधील क्षेत्र ज्यांची चतुःसिमा पुर्व- मि.क्र.२७, पश्चिम ६ मी रस्ता, दक्षिण- मि.क्र. ३१, उत्तर- मि.क्र.३३ यावरील चतुःसिमा मधील **९२.९३ चौ. मीटर** जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसांच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीन व शिक्काने दिले आहे.

**मुख्याधिकारी, स्वाक्षरी, नगर परिषद, परतूर**

## बहुप्रांतीय अधिवेशनात दृष्टी लायन्स नेत्रालय परतुरचा गौरव

# लायन मनोहर खालापुरे यांचा विशेष सन्मान

**परतूर । प्रतिनिधी -** नाशिक येथे शनिवार दि. १७ मे रोजी पार पडलेल्या लायन्स इंटरनॅशनल मल्टीपल ३२३४ च्या बहुप्रांतीय अधिवेशनात लायन मनोहर खालापुरे यांना पुरस्कार प्रदान करून सन्मान करण्यात आला, ही बाब परतुर करिता अत्यंत अभिमानास्पद आहे

लायन्स इंटरनॅशनलचे तृतीय अध्यक्ष मनोज शहा, जितेन्द्रसिंह चव्हाण, नवल मालु, मल्टीपल चेअरपर्सन सुनिल देसरडा आणि गॅट समन्वयक प्रदीप गर्ग यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ग्रामीण भागाकरिता दृष्टी लॉयन्स नेत्रालयाच्या माध्यमातून कायमस्वरूपी कौतुकास्पद असलेला प्रकल्पाची या अधिवेशनामध्ये दखल घेण्यात आली . या प्रकल्पाला गतिमान करण्यासाठी जालना लायन्स क्लब व परतुर लायन्स क्लब च्या माध्यमातून सहकार्य करण्यात येत आहे . दृष्टी फाउंडेशनचे अध्यक्ष लायन मनोहर खालापुरे यांच्या पुढाकाराने हा प्रकल्प कमी कालावधीमध्ये प्रगतीपथावर असल्याने या क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी खालापुरे यांना सन्मानित करून गौरवण्यात आले आहे .

याप्रसंगी माजी प्रांतपाल विजयजी बगडीया तथा पुरुषोत्तम जयपुरीया, क्लब अध्यक्षा जयश्री लड्ढा, सचिव मंजु श्रीमाली, कोषाध्यक्ष कल्पना बियाणी, झोन चेअरपर्सन राजेश लुणीया, मीनाक्षी दाड, अतुल लड्ढा, जयप्रकाश श्रीमाली, बद्रीनारायण बियाणी, डॉ संदीप चव्हाण, डॉ भानुदास कदम, राजेश देवीदान, अरुण मित्तल, श्याम लोया, कमलकिशोर बगडिया, सरीता बगडिया, विजय दाड, दीनेश लोहिया, सपना लुणीया, बळीराम बेंद्रे, सुनिल बियाणी, विनोद पवार, राज केदारे, शतीश संचेती , नरेंद्र मोदी, प्रेम लता मोदी, अशोक मिश्रा, धर्मेंद्र कुमावत आदींची उपस्थिती होती.



## माय भारत योजनेद्वारे नागरी संरक्षण स्वयंसेवक नोंदणी सुरु

**जालना । प्रतिनिधी -** माय भारत, भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, (नवी दिल्ली ) अंतर्गत नागरी संरक्षण स्वयंसेवक म्हणून नोंदणी करण्यासाठी देशभरातील तरुणांना सक्रियपणे एकत्रित केले जात आहे. हा देशव्यापी उपक्रम तरुण नागरिकांना राष्ट्रीय कार्यात सहभागी करून घेण्याचा आणि विशेषतः आणीबाणी व संकटाच्या वेळी महत्त्वाची भूमिका पार पाडण्यासाठी सक्षम करण्याचा प्रयत्न करत आहे. नैसर्गिक आपत्ती, अपघात, सार्वजनिक आणीबाणी आणि इतर अनपेक्षित परिस्थितीत नागरी प्रशासनास सहकार्य करू शकणारे एक प्रशिक्षित, प्रतिसादक्षम व लवचिक स्वयंसेवक दल तयार करणे, हे या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. सद्याची परिस्थिती आणि वाढत्या सुरक्षा चिंता लक्षात घेता, एक मजबूत समुदायाधारित प्रतिसाद यंत्रणा उभारण्याची निकड आहे. नागरी संरक्षण स्वयंसेवक स्थानिक प्रशासनाला बचाव व निर्वासन, प्रथमोपचार अशा विविध सेवा देण्यामध्ये मोलाची मदत करतात. नोंदणीसाठी अधिकृत संकेतस्थळः https://mybharat.gov.in नोंदणी प्रक्रिया सोपी आणि सर्वांसाठी खुली आहे. तरुणांनी पुढे येऊन या राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन प्रणीत सांगवीकर यांनी केले आहे.









# पावसाळ्यात विजांपासून रक्षण

भारतात जून महिन्यात मान्सुन ऋतूचे आगमन होते. यावेळी शेतकरी आपल्या शेतीच्या मशागतीला सुरुवात करतात. शेतमजूरही शेतीच्या विविध कामात व्यस्त होतात. या कालावधीत वादळ आणि वीजेच्या कडकडाटसह पावसाला सुरुवात झाल्यास शेतावर काम करणारे शेतकरी-शेत मजूर आणि इतरांना नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागते. दरवर्षी वीज पडून शेकडो नागरिकांना आपले प्राण गमवावे लागत होते. विशेषतः शेतकरी, मेंढपाळ यांना शेतात, जंगलात उघड्यावर वीज, वारा यांचा सामना करावा लागतो. या पावसाळ्यात पडणाऱ्या वीजेपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने सूचविलेल्या गोष्टींची खबरदारी घेतल्यास विजेच्या आपत्तीला तोंड देता येऊ शकते. तसेच विजेपासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी सुरक्षितता कशी बाळगली पाहिजे हे आपण बघू या. शेतात काम करीत असतांना वीजा कडाडत असल्यास शेतातील घराचा आसरा घ्यावा. पाण्यात असल्यास तात्काळ पाण्याबाहेर यावे. एखाद्या झाडाजवळ असल्यास झाडाच्या उंचीपेक्षा झाडापासून दुप्पट अंतरावर उभे राहावे. ओल्या शेतात रोपे लावण्याचे व अन्य काम करणाऱ्या व्यक्ती किंवा तलावात काम करीत असलेल्या व्यक्तींनी तात्काळ कोरड्या किंवा सुरक्षित स्थळी जावे. शेतामध्ये काम करीत असतांना सुरक्षित ठिकाणी आसरा घेतला नसेल तर शक्यतो जिथे असेल तिथेच रहावे. शक्य झाल्यास पायाखाली लाकूड, प्लॅस्टिक, गोणपाट सारख्या वस्तू अथवा कोरडा पाला पाचोळा ठेवावा. दोन्ही पाय एकत्र करुन गुडघ्यावर दोन्ही हात ठेवून डोके जमिनीकडे झुकवावे मात्र डोके जमिनीवर ठेऊ नये.

शेतात काम करतांना शेतकरी हे विविध कृषी औजारे हाताळत असतात. अशावेळी धातुपासून बनविलेल्या वस्तू यंत्र इत्यादीपासून दूर रहावे. गावाभोवती किंवा शेत, आवार, बाग-बगीचा आणि घर यांच्याभोवती तारेचे कुंपण घालू नये. कारण ते वीजेला सहजपणे आकर्षित करीत असते. धातूची दांडी असल्यास छत्रीचा उपयोग करु नये. वीजेच्या खांबाजवळ थांबू नये किंवा उभे राहू नये. तसेच झाडाखाली उभे राहू नये. उंच जागेवर झाडावर चढू नये. वीज वाहक असलेल्या रेडियेटर, स्टोव्ह, मेटल, लोखंडी पाईप आदी वस्तूपासून दूर रहावे. वीजा कडाडत असल्यास विद्युत उपकरणे बंद ठेवून शक्यतो घरातच रहावे, बाहेर पडू नये. पाण्याचे नळ, फ्रिज, टेलीफोन आदी वस्तूंना अशावेळी स्पर्श करु नये. तसेच वीजेपासून चालणाऱ्या यंत्रापासूनही दूर रहावे. कपडे वाळविण्यासाठी तारेचा वापर न करता, सुतळी अथवा दोरीचा वापर करावा.

कोसळणाऱ्या वीजेपासून संरक्षण करण्यासाठी मजबूत असलेले पक्के घर हे सर्वांत सुरक्षित ठिकाण आहे. शक्य असल्यास आपपल्या घरी वीज वाहक यंत्रणा बसवावी. टेलीफोन आणि विजेचे खांब किंवा टेलीफोन/टेलीव्हिजन टावर यापासून दूर रहावे. आपल्या घराशेजारी किंवा शेत जमिनीच्या आसपास कमी उंचीची झाडे लावावी.

मोठ्या प्रमाणात वीजा चमकत असल्यास किंवा कडकडाट सुरु असल्यास प्लग जोडलेली उपकरणे हाताळू नये. दूरध्वनीचा वापर अशावेळी करु नये. दोन चाकी वाहन, सायकल, ट्रक, ट्रॅक्टर किंवा नौका यावर असल्यास तात्काळ उतरुन सुरक्षित ठिकाणी जावे. अशा परिस्थितीत वाहनातून प्रवास करु नये. एखाद्याच्या शेतावर किंवा घराशेजारी उंच वृक्षाचे खोड अथवा फांदीवर तांब्याची एक तार बांधून तिचे दुसरे टोक जमिनीत खोलवर गाडून ठेवावे. म्हणजे हे झाड सुरक्षित होईल. वाहनातून प्रवास करत असल्यास वाहनातच रहावे. वाहनाच्या बाहेर थांबणे आवश्यक असल्यास धातुचे कोणतेही उपकरण हातात बाळगू नये. जंगलात गेले असल्यास कमी उंचीच्या व दाट झाडांचा आसरा घ्यावा. वृक्ष दलदलीची ठिकाणे अथवा पाण्याचे स्त्रोतापासून शक्यतो दूर रहावे किंवा आकाशाखाली राहण्यापेक्षा लहान झाडाखाली आसरा घ्यावा. मोकळ्या आकाशाखाली राहणे आवश्यक असल्यास खोलगट ठिकाणी रहावे. एकाच वेळी जास्त व्यक्ती एकत्र राहू नये. दोन व्यक्ती असल्यास किमान त्यांचात १० ते १५ फुट अंतर असणे आवश्यक आहे. पोहणारे किंवा मच्छिमारी करणाऱ्यांनी अशावेळी तात्काळ पाण्यातून बाहेर यावे.

**विजेबाबत काही काल्पनीक समज आणि वास्तव**

समजूत : वीज एकाच ठिकाणी दुस-यांदा कधीही पडत नाही.

वास्तव : निर्जन स्थळी, उंच इमारतीवरील कळसावर वीज वारंवार कोसळते, जिथे वीज पडण्याची शक्यता जास्त असते, अशा जागा वादळी हवामानात टाळयाव्यात.

समजूत : पाऊस पडत नाही व ढगाळ हवामान नसेल, तर आपल्यावर वीज पडणार नाही.

वास्तव : वीज जवळ जवळ ५ कि. मी. अंतरावर सुध्दा पडू शकते. त्यामुळे हवामान ढगाळ नाही, पाऊस नाही, तरीही वीज पडू शकते, वज्राघात (जास्त ताकदीची वीज) कधी कधी २०-२५ किमी अंतरावर सुध्दा पडू शकते. अगदी दुर्मिळ प्रसंगी वीज ८० कि.मी. अंतरावर देखील पडल्याच्या घटना घडलेल्या आहेत.

समजूत : चार चाकी वाहनात असतांना रबर टायरमुळे विजेपासून संरक्षण होते.

वास्तव : वीज टायरपासून २ इंच दुरच राहते हे खरे आहे. पण खरे पाहता, संरक्षण होण्यास टायर बरोबरच धातूचे छप्पर व बाजूमुळे मदत होते. मोटरसायकल, सायकल, उघड्या टपाची चारचाकी वाहने, फायबर ग्लास, प्लॅस्टीकचे कवच असलेली चारचाकी वाहने यांना विजेपासून तसे संरक्षण मिळत नाही. शेतावरील ट्रॅक्टर ट्रॉली यांना जर छप्पर नसेल, तर त्यांनाही तसे संरक्षण मिळत नाही. पण त्यांना छप्पर असेल, तर ती वाहने सुरक्षित राहतात.

समजूत : ज्याच्या अंगावर वीज पडली आहे, ती व्यक्ती विद्युतभारीत असते आणि तिला स्पर्श केल्यास आपल्याला सुध्दा विजेचा झटका बसतो.

वास्तव : मानवी शरीर वीज साठवून ठेवू शकत नाही. त्यामुळे वीजबाधित व्यक्तीला स्पर्श करणे वा त्या व्यक्तीला प्राथमिक उपचार करणे, यात मदत करणाऱ्या व्यक्तीला कसलाही धोका नसतो. वरील कल्पित समज अत्यंत चुकीचा आहे. अशा अपसमजामुळे सीपीआर किंवा कृत्रिम श्वासोच्छवास असे प्राथमिक उपचार दिले गेलेले नाहीत. तर एखादी व्यक्ती वाचण्याची ९० टक्के शक्यता असूनसुध्दा ती मृत्युमुखी पडू शकते.

समजूत : जर पावसाळी वादळी हवामानात सापडलात, तर झाडाखाली आश्रय घ्यावा.

वास्तव : वीज पडून मृत्युमुखी पडण्याची जी प्रमुख कारणे आहेत, त्यात झाडाखाली थांबलेल्या लोकांचा दुसरा नंबर लागतो.

समजूत : पावसाळी हवामानात मी घरातच राहीलो, तर मी सुरक्षित आहे.

वास्तव : पावसाळी/वादळी हवामानात घरात राहणे हे निश्चितच चांगले आहे, पण पूर्ण सुरक्षित आहे असे नाही. वीज-प्रवाह ज्याच्यातून वाहू शकतो, अशा गोष्टी असुरक्षित आहेत. उदा. बाहेरुन घरात येणारी ओली पाऊलवाट, टेलिफोनच्या-टिव्हिच्या-विजेच्या तारा, विजेची उपकरणे, तसेच नळ (अगदी प्लॅस्टिकचे नळ-ज्यातून पाणी वाहत असते). लोखंडी दारे, खिडक्या इत्यादी, विजेचा कडकडाट होत असताना खिडकीजवळ उभे राहणे धोकादायक असते. त्यापेक्षा खोलीत आतील भागात राहणे जास्त सुरक्षित असते.

समजूत : मैदानी खेळ चालू असतांना विजेचा कडकडाट झाला, पाऊस आला, तरी आसरा घ्यायच्या ऐवजी खेळ संपेपर्यंत खेळत राहिले पाहिजे. धातूनिर्मित वस्तु, अंगावरील धातूचे दागिने, घड्याळ, पाठीवरील पिशव्या विजेला आकर्षित करतात.

वास्तव : मैदानी खेळात वीज पडून मृत्युमुखी पडणे/जखमी होणे ह्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. आयुष्यापेक्षा कुठलाही खेळ महत्त्वाचा नसतो. मैदानी खेळ खेळणाऱ्या व्यक्तींनी कडाडणाऱ्या विजेपासून संरक्षण मिळवण्यासाठी आधीच एक योजना बनवावी आणि ती सर्वांना माहिती करुन द्यावी. त्याप्रमाणे वागणे बंधनकारक करावे. वरील हवामानात विजेच्या कडकडाटासह पाऊस झाला. तर सुरक्षित जागेत त्वरित आसरा घ्यावा, लहान मुलांचे संरक्षण करणे, ही मोठ्याची जबाबदारी आहे, हे विसरु नये.

समजूत : धातूनिर्मित वस्तु, अंगावरील धातूचे घड्याळ, पाठीवरील पिशव्या विजेला आकर्षित करतात.

वास्तव : उंच, टोकदार आणि एकाकी जागा ह्यांच्यावर वीज पडणे ह्याची शक्यता जास्तीत-जास्त असते. त्यामुळे धातूनिर्मित वस्तू असल्या तरी काही फरक पडत नाही. डोंगर जरी दगडा-मातीचे असले, तरी त्यावर दर वर्षी अनेकदा वीज कोसळते. विजेचा कडकडाट सुरु झाला तर प्रथमतः चांगले संरक्षण मिळेल असा आसरा विनाविलंब घ्यावा. अंगावरील दागिने काढण्यात वेळ घालवू नये किंवा जिथे नीट संरक्षण मिळणार नाही, अशी जागा टाळावी. धातू विजेला जरी आकर्षित करत नसेल, तरी पण ज्यांची लांबी धातूनिर्मित वस्तू (तारेची कुंपणे, कठडे, वाहने इ.) धोकादायक असतात, त्यापासून दूरच राहवे. वीज जर कोसळली, तर अशा वस्तू वीज भारवाहक असल्याने ती प्रवाहित वीज अगदी १०० मीटर अंतरापर्यंत येऊन एखाद्या व्यक्तीला मृत्युदंड देवू शकते.

समजूत : वादळी हवामान, विजा कडकडत असतांना जर एखादी व्यक्ती त्यात अडकली, तर जमिनीवर लोटांगण घालणे हे सुरक्षित. जर वीज पडण्याची शक्ता असेल, तर टोकदार सुळक्याच्या जवळ ४५ च्या शंकुक्षेत्रात पोहोचल्याने वीजक्षतीपासून संरक्षण मिळते.

वास्तव : ही अगदी कालबाह्य व पूर्ण चुकीची समजूत आहे. खरे पाहता जमिनीवर बसावे, दोन्ही गुडघे एकत्र करून त्यात डोके खुपसावे आणि दोन्ही हातांनी पायांना मिठी मारून बसावे, जमिनीवर वीजप्रवाह वाहू लागल्यास तो ३० मीटर पर्यंतसुध्दा वाहतो आणि तो धोकादायक असू शकतो. जरी जमिनीवर झोपल्याने पडणाऱ्या विजेपासून संरक्षण मिळण्याचे प्रमाण वाढते, ही गोष्ट चांगली, तरी जमिनीवरुन प्रवाहित विजेचा धोका वाढतो, ही गोष्ट वाईटच. त्यामुळे कमीत-कमी उंचीवर असणे व जमिनीशी कमीत-कमी स्पर्श असणे, ह्याची सांगड घालायची असेल, तर वरील कृती करणे, हेच जास्त सुरक्षित. खरे पाहता, घराबाहेर जाताना वादळी हवामान टाळणे हेच महत्त्वाचे ठरते. हा उपाय अगदी शेवटचा.

समजूत : जर वीज पडण्याची शक्यता असेल, तर टोकदार सुळक्याच्या जवळ ४५ च्या शंकूक्षेत्रात पोहोचल्याने वीजक्षमतेपासून संरक्षण मिळते.

वास्तव : शंकुक्षेत्र संरक्षण हा समज चुकीचा आहे. उंच इमारती, सुळके ह्यांच्यावर वीज पडण्याची जास्तीत-जास्त शक्यता असते, तरीही त्याच्या जवळपास असणाऱ्या व्यक्ती, वस्तू यावर वीज पडणारच नाही असे नाही. त्यावरही वीज पडू शकते. शिवाय उंच इमारती, सुळके ह्यांच्यावर वीज पडली, तर त्याच्या ३० मीटरच्या परिघात असलेल्या व्यक्तीवर पण त्याचा आघात होऊ शकतो, आणि जर वीज ज्यावर पडली असते, त्या वस्तूला स्पर्श झाला किंवा वीजस्फोटाच्या परिघात जरी एखादी व्यक्ती असेल, तरी मृत्युदंड निश्चितच, त्यामुळे हे लक्षात घ्यावे की, विजेचा कडकडाट होत असतांना बाहेर जाणे टाळणे, हेच इष्ट. वीजप्रपात हा कधीही तथाकथित शंकुक्षेत्रात होऊ शकतो.

वीज पडून मृत्यू होण्याची भारतातील आकडेवारी फार मोठी आहे. दरवर्षी शेकडो लोक अशाप्रकारच्या नैसर्गिक आपत्तीमुळे आपले प्राण गमावतात. बऱ्याच घटनांमध्ये जागरुकता नसल्यामुळे मृत्यू होतात. अशा वेळी वरील स्वरक्षण पध्दतीचा अवलंब केल्यास वीजेपासून स्वतःचे व इतरांचे संरक्षण करण्यास नक्कीच मदत होईल.

**जिल्हा माहिती कार्यालय**
**जालना**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.